कोर्ट विद्यमान न्यायदंडाधिकारी, प्र. श्रे., कोर्ट क्र.५, गोंदिया यांचे न्यायालय

**गुन्हयाचा तपशील**

**सं.फौ.ख.क्र. २८८३/२०२२** **नि.क्र. ३**

| | | |
|---|---|---|
| १. | अपराध घडल्याचा दिनांक | — १८.०६.२०२२ |
| २. | तक्रार दाखल केल्याचा दिनांक | — १८.०६.२०२२ |
| ३. | तक्रार दाखल करणा—याचे नांव व पत्ता | — पोलीस अधिकारी,<br>गोंदिया शहर पोलीस स्टेशन, गोंदिया. |
| ४. | आरोपीचे नांव, वय व पत्ता | — प्रदिप सक्रमदास कोडवाणी,<br>वय — ४६ वर्षे,<br>राहणार — रेलटोली, ता. जि. गोंदिया |

५. **गुन्हयाचा तपशील** —

दिनांक १८.०६.२०२२ सायंकाळी ०७:१० वाजेच्या सुमारास मौजा आंबेडकर चौक, ता.जि. गोंदिया येथे तुम्ही तुमच्या ताब्यातील मोटरसायकल क्र. **एम.एच.—३५/एएम—४५५४** हे जोराने चालवून सार्वजनिक रस्त्यावरील वाहतुकीस अडथळा केला व दुस—या जिवाला धोका किंवा नुकसान पोहचेल अश्या त—हेने वाहन चालविले आणि अशा प्रकारे तुम्ही मोटार वाहन कायद्याचे कलम १८४ अन्वये गुन्हा केला आहे.

वरील गून्हयासंबंधी तपशील आरोपीला वाचून व समजावून सांगितला.

**आरोपीचे निवेदन**

प्रश्न—१. तुम्हाला तुमचे विरुध्द दाखल झालेल्या खटल्याचे कागदपत्र मिळाले काय ?
उत्तर होय.

प्रश्न—२. तुम्हाला तुमचेवर ठेवण्यात आलेला अपराध वाचुन दाखविला तो तुम्हास समजला काय?
उत्तर होय.

प्रश्न—३. तुम्हाला गुन्हा कबुल आहे काय ?
उत्तर होय.

...............................................

आरोपीची सही

**<u>न्यायनिर्णय</u>**
**(दिनांक १२ नोव्हेंबर, २०२२ रोजी पारीत)**

आरोपीने गुन्हा कबूल असल्याचे न्यायालयाला सांगितले. आरोपीला गुन्हा कबूल असल्यामुळे आरोपीला सदर खटल्यामध्ये दोषी धरण्यात येते. आरोपीला शिक्षेबाबत विचारले असता आरोपीने कमीत कमी दंड करावा म्हणून विनंती केली.

आरोपीने स्वेच्छेने त्याचेविरूद्ध असलेला गुन्हा न्यायालयासमक्ष मान्य केला. करीता त्याने केलेल्या गुन्हयाचे स्वरूप पाहता मी खालील आदेश पारीत करीत आहे.

**<u>आदेश</u>**

**१)** आरोपी **प्रदिप सक्रमदास कोडवाणी** यास मोटार वाहन कायद्याचे कलम १८४ प्रमाणे शिक्षेस पात्र असलेल्या अपराधाकरीता दोषसिद्ध ठरविण्यात येवून **१,०००/— रूपये (अक्षरी एक हजार रूपये)** फक्त एवढया दंडाची शिक्षा देण्यात येत आहे. आरोपीने दंड न भरल्यास त्यास १ दिवसाची साध्या कारावासाची शिक्षा देण्यात येत आहे.

दिनांक : १२.११.२०२२

न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
गोंदिया.